भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार )

जा.क्र. ५४८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—३०/०८/२०१६

**१) अश्लिल शब्दात शिविगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . . :—**

दिनांक २८/०८/०१६ रोजी २१.४५ वा. दर. यातील फिर्यादी सुदाम सदाशिव शरनागते वय ६८ वर्ष, रा. उसरला हा गावाच्या चौकातील हनुमान मंदीराचे ओठयावर गावचे इतर लोकासोबत बसला असता व धानाच्या आणि शेतीच्या गोष्टी करत असतांना यातील आरोपी हा तेथे येवुन फिर्यादीस तु लोकचंद शरनागते यांच्या गोष्टी कश्याला करतेस असे बोलुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन दगडाने आणि काठीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,३२३,५०६भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परतेकी पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**२) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २८/०८/०१६ रोजी १७.०० ते १७.३० वा. वाहन क्र. एमएच ३४ के ६३७९ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन निलज फाटा येथे सार्वजनिक रोडवर ऊभे करून येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) एसीबी भंडारा याची कार्यवाही . :—**

दिनांक २९/०८/०१६ रोजी १४.३० वा. दर. यातील तक्रारदार राजु गायधने यास आरोपी यांनी मा. सह. संचालक जिल्हा. कौशल विकास रोजगार उदयोजकता मार्गदर्शन केन्द्र भंडारा यांनी त्याचे पत्र क्र. १०१/०९ मा. वी./९०९/२०१६ दि. ०२/०५/२०१६ अन्वये जिल्हा महीला बालविकास अधिकारी कार्यालय भंडारा यांचे कार्यलयातुन अंतिम आदेश काडुन देण्याकरीता आपल्या पदाचा स्वत:चे आर्थीक लाभाकरीता वाम भष्ट मार्गाचा गैर वापर करुन १०,०००/—/रु. ची लाचेची मागणी करुन तरजोड नंतर ५,०००/—रु. ची लाच रक्कम स्विकारल्याने असे सरतर्फे फिर्यादी पोलीस निरीक्षक योगेश्वर पारधी एसीबी भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ७, १३,(१)(ड)१३(२)ला. प्र. का सन १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक योगेश्वर पारधी एसीबी भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई.:—**

दिनांक २९/०१/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ११८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस, अवैध प्रवासी ०२ केसेस तसेच ईतर वाहनांवरती ११० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.